## - स्नेहबंध -

**संपादकीय -**

टोरांटो व आसपासच्या शहरातील मराठी बांधवांना एकत्रित आणणारा हा 'स्नेहबंध' आपणा सर्वांना सादर करतांना आम्हास फार आनंद होत आहे. मंडळातर्फे प्रस्तुत होणाऱ्या वार्तापत्रासाठी जी काही नावे पुढे आली त्यात अनामिकांचे 'स्नेहबंध' हे नामकरण पुष्कळांना आवडले. आपणासही ते पसंत पडेल अशी आशा आहे.

तेरा मार्च रोजी डॉ. टिळक यांच्या निवासस्थानी भरलेल्या सभेत कार्यकारिणीतील काही अनुभवी व तज्ञ व्यक्तींनी निवृत्तीची विनंति केल्याने, काही नवीन व्यक्तींचा समावेश करून नवीन कार्यकारी मंडळ नियुक्त करण्यात आले. सर्वांच्या माहितीसाठी सध्याच्या कार्यकारिणीतील सभासदांची नावे व दूरध्वनि क्रमांक देत आहोत:-

1) डॉ. टिळक (अध्यक्ष) ४४५-९९२८
2) सौ. टिळक (लेखापाल) ४४५-९९२८
3) श्री. बाळ जोशी ७५१-४३०८
4) श्री. श्रीराम मुळगुंद ४४४-५००९
5) श्री. अरुण रानडे ४२९-०९२५
6) श्री. गंगाधर देशपांडे ४५९-४६८८
7) श्री. रवि करमरकर ४४४-२९५९
8) डॉ. प्रताप रांगणेकर २७९-३९८५
9) श्री. नारायण कंदरगांवकर (लेखापाल) ४९५-६९६०
10) सौ. कुंदाताई पाटील २३९-९५४७
11) श्री. दत्ता सायगांवकर (कार्यवाह) ५३३-५३९६

नवीन कार्यकारी मंडळ नेमल्यामुळे नवे सभासद आपल्याबरोबर नवीन कल्पना व उत्साह आणून कार्यक्रम अधिक यशस्वी करतील अशी कल्पना आहे. अशाप्रकारे नवीन लोकांचा मंडळाशी जास्त निकटचा संबंध येऊन मंडळाची अंतर्गत व्यवस्था जास्त सभासदांना समजेल. त्याचबरोबर कार्यक्रम चांगले पार पाडण्यासाठी कार्यकारिणी मंडळास आपणा सर्वांच्या सहकार्याची जरुरी आहेच, तेव्हा कोणत्याही प्रकारची मदत, क्रियाशील सूचना देऊ इच्छिणाऱ्यांनी कार्यवाहांशी संपर्क साधावा. मंडळाशी संपर्क साधून आपल्या अंगच्या कलेची अभिव्यक्ती करु इच्छिणाऱ्या कलावंतांकडून कार्यक्रम ठरविण्यासाठी वाढत्या प्रमाणात चौकशी केली जात आहे. त्यापैकी काही खालीलप्रमाणे:-

1) एअर इंडियातील सेवकांचे 'कलाकार' पथक - 'रवून पहाता करुन'
'तुझे आहे तुजपाशी'

2) कु. प्रभा अत्रे - नवोदित सुप्रसिद्ध गायिका- शास्त्रोक्त व भावगीतें
3) सौ. मीनाक्षी ठाकोर - अहमदाबादच्या प्रसिद्ध नृत्य-विशारद.
4) श्री. अरविंद गजेंद्रगडकर - संगीत समीक्षक व वादनपटु.
5) श्री. सुधीर फडके - ख्यातनाम गायक.

शक्यतो प्रत्येकाच्या कलेस उत्तेजन देण्याचा प्रयत्न मंडळ करीत असून, यशावकाश कार्यक्रमांची पूर्वसूचना सर्वांना दिली जाईलच. काही वेळा कार्यक्रम दोन दिवस लागोपाठ आल्यास टोरांटोबाहेरच्या मंडळींना मुक्काम करणे भाग पडते. पुष्कळांची विशेष ओळख, नाती वा मैत्री असल्याने मुक्कामाची सोय होत असली तरी काही नवीन मराठी भाषिकांना मुक्कामाची सोय झाल्यास बरे पडते या

जुन्या आठवणी- स्नेहबंधच्या पहिला अंक, १९७७.
श्री. गंगाधर देशपांडे यांचे सौजन्याने.